# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३९७/२०२३ दिनांक – १०/११/२०२३

## वाहतूक पोलीसांच्या सर्तकतेमूळे रिक्षामध्ये विसरलेला किंमती मुद्येमाल परत काशिमीरा वाहतूक विभाग यांची कामगिरी

मिरा-भाईदर शहरातील भाईदर पश्चिम रेल्वे स्टेशन या ठिकाणी दिनांक १०/११/२०२३ रोजी सकाळी ०७.३० वाजण्याच्या सुमारास गुजरात येथील राहणारे श्री. हर्ष अजित शहा वय ३१ वर्षे, रा. रुम नं ०३, औकांर सोसायटी, रखैयाल स्टेशन, तहसिल- देहगाम, जि. गांधीनगर राज्य गुजरात हे गुजरात येथून बोरीवली या ठिकाणी रेल्वेने उतरले होते. त्यानंतर ते लोकल ट्रेनने बोरीवली स्टेशन ते भाईदर पश्चिम रेल्वे स्टेशन या ठिकाणी ०८.०० वाजण्याच्या सुमारास उतरले होते. त्यानंतर भाईदंर पश्चिम रिक्षा स्टॅन्ड येथून एका रिक्षा मध्ये ०८.१० वाजण्याच्या सुमारास बसून ६० फिट रोड, भाईदर पश्चिम येथील नातेवाईक यांच्या कडे गेले. त्यावेळेस त्यांना समजले की, त्यांच्या कडे असलेली बॅग ही रिक्षामध्ये राहिली असून सदर बॅगे मध्ये त्यांचे दोन तोळे सोन्याची चेन, एक तोळा सोन्याची रिंग, सॅमसग कंपनीचा एम ५१ कंपनीचा मोबाईल हा सदर बॅगेमध्ये या किंमती वस्तू होत्या. त्यानंतर त्यांनी लगेच भाईदर पोलीस ठाणे या ठिकाणी जावून मालमत्ता गहाळ क्रं. ००२५/२०२३ प्रमाणे दिनांक १०/११/२०२३ रोजी हरवलेल्या मालमत्ते संदर्भात तक्रार नोंद केली.

सदर घटने बाबत श्री हर्ष अजित शहा यांनी काशिमीरा वाहतूक विभागातील भाईदर रेल्वे स्टेशन येथे वाहतूक पॉईटवर कर्तव्य करण्यासाठी असलेले पोहवा/०७१३१ नरसिंग लक्ष्मण चव्हाण यांना सदरचा प्रकार सांगितल्या नंतर पोहवा/०७१३१ चव्हाण यांनी तात्काळ सदर घटनेचे गांभार्य लक्षात घेवून सदरची माहिती प्रभारी अधिकारी पोनिरी/ श्री. देविदास हंडोरे यांना दिली. व त्यांच्या मार्गदर्शन व सुचनानुसार प्रवाश्याने सांगितलेल्या रिक्षाचे व रिक्षा चालकाचे वर्णनानुसार सदर रिक्षा चालकचा शोध घेतला. प्रवासी नामे श्री. हर्ष शहा यांची रिक्षात राहिलेली बॅग बाबत विचारणा केली असता सदर रिक्षा क्रमांक एमएच ०४ एफसी ७६२२ याचा चालक नामे महेशकूमार चंदूलाल काछीया रा. भाईदर पश्चिम याने लगेच पोहवा/चव्हाण यांच्या कडे येवून सदर बॅग विषयी माहिती दिली. प्रवाशाची मुद्देमाल बॅगेविषयी खात्री केली असता ती त्याची असल्याचे निष्पन्न झाले. सदर बॅगेमध्ये दोन तोळे सोन्याची चेन अंदाजे १,००,०००/-रु. किमंतीची, एक तोळा सोन्याची रिंग- अंदाजे ५०,०००/- रु. किमंतीची, सॅमसग कंपनीचा एम ५१ कंपनीचा मोबाईल-अदांजे किमंत १५,०००/-रुपये किमंतीचा असा एकूण १,६५,०००/-रुपये किमंतीचा मुद्देमाल मिळून आला तो मुद्देमाल श्री. हर्ष शहा यांना सुस्थितीत परत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय), श्री. विलास सानप, सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक, व काशिमीरा वाहतूक विभागाचे प्रभारी अधिकारी पोनिरी/देविदास हंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा/०७१३१ नरसिंग लक्ष्मण चव्हाण यांनी केली आहे.


काशिमीरा वाहतुक विभाग कारवाई तक्ता

********